# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 17 August 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांकः १७ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील महिला अत्याचाराच्या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला असून राज्यातही अनेक वैद्यकीय संघटना संपात सहभागी झाल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर इथंही क्रांतिचौकात भारतीय वैद्यकीय संघटनेच्या वतीनं निदर्शनं करण्यात आली आहे. या संपात शहरातील काही खासगी वैद्यकीय रुग्णालयं, प्रशिक्षणार्थी डॉक्टरांची मार्ड संघटना तसंच वैद्यकीय व्यावसायिक सहभागी झाले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय घाटीतल्या निवासी डॉक्टरांनीही संप पुकारला असून अत्यावश्यक सेवा मात्र सुरु आहेत.

****

केंद्रीय मंत्रीमंडळानं तीन नव्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांना काल झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. यात पुणे मेट्रो रेल्वेच्या पहिल्या टप्प्यात स्वारगेट ते कात्रजपर्यंत विस्तार, ठाणे इंट्रीगल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि बंगळुरु मेट्रो रेल्वेच्या तिसऱ्या टप्पाचा यामध्ये समावेश आहे. मेट्रो रेल्वे १० वर्षांपूर्वी केवळ पाच शहरांमध्येच होती, आता देशभरात २१ शहरांमध्ये मेट्रो रेल्वेचं जाळं आहे, असं सूचना आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीनंतर सांगितलं.

रेल्वे जाळ्यांच्या लांबीच्या बाबतीत भारत जगभरात तिसऱ्या स्थानावर असल्याचं ते म्हणाले. ठाणे इंटीग्रम रिंग मेट्रो प्रकल्प २०२९ पर्यंत सुरु होणार असून ठाणे पश्चिम विभागात याअंतर्गत २२ रेल्वेस्थानकं असतील तर पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्यासाठी मदत होणार असून फेब्रुवारी २०२९ पर्यंत हा प्रकल्प तयार होईल अशी अपेक्षा असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय लाभ प्रदान कार्यक्रम आज दुपारी पुण्यात बालेवाडी क्रीडांगण इथं होत आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार असून महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्यातील लाभ जमा करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यामध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये जमा होण्यास परवापासून प्रारंभ झालेला आहे.

****

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १ लाख ७९ हजार २०५ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १ लाख ७६ हजार ७९४ महिलांचे अर्ज पात्र ठरले आहेत. तर नांदेड जिल्ह्यातील एकूण पात्र महिलांची संख्या ४ लाख ७३ हजार आहे.

****

गेल्या आर्थिक वर्षात भारताची आर्थिक वृद्धी अपेक्षेपेक्षा खूपच चांगली झाली आणि २०२७ पर्यंत देश जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची अपेक्षा आहे, असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आयएमएफच्या उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. गीता गोपीनाथ यांनी म्हटलं आहे.

दुचाकी विक्रीपासून ते ग्राहकोपयोगी वस्तूंचा भारतातील वापर वाढत असल्याचंही त्या म्हणाल्या.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब साठी संयुक्त चाळणी परीक्षेचं उद्या १८ ऑगस्टला तर, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ या परीक्षेचं आयोजन येत्या २५ तारखेला करण्यात आले आहे. यासंदर्भातली माहिती आयोगाकडून देण्यात आली.

****

आश्रमशाळांमधील पोषण आहारात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचं सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी म्हटलं आहे. पालघर जिल्ह्यातल्या कांबळगाव मधल्या आश्रम शाळेच्या परिसरात असलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहाला पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर ते बोलत होते काही दिवसांपूर्वी एकात्मिक

आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत आश्रमशाळांमधील ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पोषण आहारातून विषबाधा झाल्याची दुर्घटना घडली होती, असे प्रकार टाळण्यासाठी कठोर कारवाई आवश्यक असल्याचं ते म्हणाले.

****

पॅरिस इथं पॅरालम्पिक अर्थात दिव्यांगांच्या ऑलिम्पिक स्पर्धांना २८ ऑगस्टपासून प्रारंभ होत आहे.  आठ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेसाठी ८४ खेळाडूंचं भारतीय पथक पॅरिसला रवाना झालं आहे. टोकियो पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता सुमित अंतिल आणि भाग्यश्री जाधव पॅरिस पॅरालिम्पिकच्या उद्घघाटन समारंभात भारतीय पथकाचे ध्वजवाहक असतील.

****